धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ऑनलाईन औषध विक्रीविरोधात जिल्ह्यात मेडिकल स्टोअर्स बंद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मे -**

ऑल इंडिया केमिस्ट्स असोसिएशनच्या देशव्यापी बंदला धाराशिव जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. धाराशिव जिल्हा केमिस्ट असोसिएशनच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील शंभर टक्के मेडिकल स्टोअर्स बंद ठेवत कडकडीत बंद पाळण्यात आला.

मेडिकल स्टोअर चालक, फार्मासिस्ट आणि असोसिएशनचे पदाधिकारी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आंदोलनकर्त्यांनी ऑनलाईन औषध विक्रीविरोधात घोषणाबाजी करत जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला.

यावेळी सादर करण्यात आलेल्या निवेदनात ऑनलाईन औषध विक्री तात्काळ बंद करण्याची मागणी करण्यात आली. फार्मासिस्ट हे केवळ व्यावसायिक नसून आरोग्यसेवक असल्याचे आंदोलनकर्त्यांनी नमूद केले.

तसेच बनावट औषध निर्मिती करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करून दर्जेदार औषध उत्पादकांना प्रोत्साहन देण्याची मागणीही करण्यात आली.

आंदोलनात जिल्ह्यातील औषध विक्रेते, मेडिकल स्टोअर चालक व फार्मासिस्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# केवळ वृक्षलागवड नव्हे, तर संगोपनही महत्वाचे : जिल्हाधिकारी पुजार

### ३०० कोटी वृक्षारोपण अभियानासाठी धाराशिव जिल्हा प्रशासन सज्ज...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मे -**

शहरी भागात वाढते सिमेंटीकरण आणि काँक्रीटच्या इमारतींमुळे तापमानात मोठी वाढ होत असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी केवळ वृक्षलागवड करून चालणार नाही, तर वृक्षांचे संगोपन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात ३०० कोटी वृक्षारोपण अभियानाच्या निमित्ताने आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदाळकर, निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, सामाजिक वनीकरण विभागाचे उपसंचालक विश्वास करे, विभागीय वन अधिकारी येडलावार, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी पुजार यांनी सांगितले की, जिल्ह्यात ३०० कोटी वृक्षारोपण अभियान यशस्वी करण्यासाठी दर्जेदार रोपवाटिका उभारणे आवश्यक आहे. कृषी विभागानेही रोपवाटिका तयार करून भविष्यात धाराशिव जिल्ह्याची रोपवाटिकांचा जिल्हा अशी ओळख निर्माण व्हावी, असे त्यांनी नमूद केले. जिल्ह्यातील रोपवाटिकांमध्ये दर्जेदार रोपे उपलब्ध असावीत आणि इतर जिल्ह्यांतूनही येथे रोपे खरेदीसाठी नागरिकांनी यावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

कंपन्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून सामाजिक संस्थांच्या मदतीने वृक्षलागवड व संगोपनाचे काम व्यापक स्वरूपात राबविले जावे, असेही त्यांनी सांगितले. सामाजिक वनीकरण विभागाचे उपसंचालक विश्वास करे यांनी अभियानाची माहिती देताना सांगितले की, महाराष्ट्रात सध्या वनाच्छादन व वृक्षाच्छादनाचे प्रमाण केवळ २१.२५ टक्के असून राष्ट्रीय वन धोरणानुसार ते किमान ३३ टक्के असणे अपेक्षित आहे. ही तफावत भरून काढण्यासाठी राज्य शासनाने ३०० कोटी वृक्षलागवडीचे महत्त्वाकांक्षी अभियान सुरू केले आहे. या मोहिमेत स्थानिक प्रजातींच्या वृक्षांची लागवड, GIS आधारित डिजिटल लँड बँक, जिओ-टॅगिंग, रिमोट सेन्सिंग, ख आधारित निरीक्षण यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. तसेच मिश्र प्रजातींची लागवड, ग्राम पंचायत स्तरावर रोपवाटिका उभारणी आणि खाजगी रोपवाटिकांसाठी Buy-Back Guarantee योजना राबविण्याचाही विचार आहे. रोपवाटिकांमध्ये रूट ट्रेनर्स, शेड नेट, ऑटोमॅटिक इरिगेशन यांसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून सक्षम आणि दर्जेदार रोपे तयार केली जाणार आहेत. मोहिमेच्या पाचव्या वर्षापर्यंत किमान ६० टक्के रोपे जिवंत राहतील, हा महत्त्वाचा निकष ठेवण्यात आला आहे.

याशिवाय झाडे लावून त्यांचे संगोपन करणाऱ्यांना ट्री क्रेडिट देण्याची संकल्पना राबविण्यात येणार असून, ती बांधकाम परवानग्या आणि औद्योगिक मंजुरी प्रक्रियेशी जोडण्याचाही शासनाचा विचार असल्याची माहिती करे यांनी दिली.

# दुधनाळ येथील शिवमहापुराण सोहळ्यासाठी सुविधांची मागणी

### लाखो भाविकांच्या पार्श्वभूमीवर ज्ञानराज चौगुले यांचे पालकमंत्र्यांना निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२० मे -**

तालुक्यातील दुधनाळ येथे दि.२७ मे ते २ जून २०२६ दरम्यान जागतिक ख्यातीचे शिवमहापुराण वाचक प्रदीप मिश्रा यांच्या शिवमहापुराण कथा प्रवचन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर माजी आमदार तथा शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले यांनी राज्याचे परिवहन मंत्री तथा धाराशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांना निवेदन देऊन भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, या प्रवचन सोहळ्यासाठी महाराष्ट्रासह शेजारील कर्नाटक राज्यातूनही लाखो भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

त्यामुळे भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासनाने आवश्यक पूर्वतयारी करणे गरजेचे आहे.

महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग, महसूल विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच पोलीस प्रशासनाला आवश्यक सूचना देऊन कार्यक्रमस्थळी व परिसरात मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी ज्ञानराज चौगुले यांनी केली आहे.

तसेच जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सर्व संबंधित शासकीय यंत्रणांमध्ये समन्वय साधून कार्यक्रम सुरळीत व सुरक्षित वातावरणात पार पडावा, अशी अपेक्षाही निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

# श्री महात्मा बसवेश्वर विद्यालयाचा स्कॉलरशिप परीक्षेत घवघवीत यश

### इयत्ता ८ वीतील ९ विद्यार्थी पात्र; वैष्णवी धरे हिचे विशेष यश

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२० मे -**

श्री महात्मा बसवेश्वर विद्यालय येथील इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांनी सन २०२६ च्या स्कॉलरशिप परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयातून एकूण ४१ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ९ विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

या परीक्षेत धरे वैष्णवी सदाशिव हिने २२८ गुण मिळवत विशेष यश संपादन केले. तसेच दिंडोरे सांची विजय हिला २१० गुण, कुलकर्णी अनुष्का रामदास हिला १७८ गुण, पतंगे श्लोक अंबादास याला १७२ गुण, धुळे आदित्य महादेव याला १६२ गुण मिळाले.

याशिवाय विश्वकर्मा सिद्दी घनश्याम हिला १५८ गुण, मुळजे वैष्णवी रोहिदास हिला १३६ गुण, कदम अभिजित नेताजी याला १३६ गुण तसेच काबरा जगदिश किशोर याला १३२ गुण मिळाले.

या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. चंद्रकांतराव महाजन, अध्यक्ष मल्लिकार्जुन आप्पा दंडगे, कार्यवाह डॉ. कपिलजी महाजन, शाळेचे मुख्याध्यापक नेताजी गायकवाड तसेच संस्थेच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

# सोन्नेवाडीत गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रेरणादायी सत्कार सोहळा

### ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव




**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२० मे -**

तालुक्यातील सोन्नेवाडी येथे ग्राम पंचायत कार्यालय सोन्नेवाडी व समस्त ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता १० वी व १२ वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा, जिद्दीचा आणि शैक्षणिक यशाचा गौरव करताना पालकांचे कष्ट, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि गावाच्या पाठिंब्याचाही सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमात एनएमएमएस पात्र विद्यार्थिनी अनुष्का प्रविण आनेराव तसेच इयत्ता १० वी व १२ वीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून हा सोहळा गावासाठी अभिमानाचा क्षण ठरला. इयत्ता १० वीमध्ये राजनंदिनी खंडू साठे यांनी ९०.२० टक्के, सिद्धी सतीश सोन्ने यांनी ९१.२० टक्के, सार्थ शिवाजी सोन्ने यांनी ९१ टक्के, पृथ्वीराज पोपट सोन्ने यांनी ८५.८० टक्के, श्रावणी नानासाहेब येडे यांनी ८२ टक्के गुण मिळवून विशेष यश संपादन केले. तसेच इतर अनेक विद्यार्थ्यांचाही यावेळी गौरव करण्यात आला.

इयत्ता १२ वीमध्ये क्षितिज संभाजी सोन्ने यांनी ९५ टक्के गुण मिळवत विशेष यश मिळविले, तर श्रावणी शाहू सोन्ने यांनी ८८ टक्के, आर्यन उद्धव शिंदे यांनी ८६ टक्के, अभिजीत विजय साठे यांनी ८४ टक्के गुण मिळवले. याशिवाय बीएएमएस प्रवेश मिळविलेल्या कोमल संतोष खंडागळे व श्रुती शिवाजी सोन्ने यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रकाश म्हेत्रे, तहसीलदार वाशी शंकर शिंदे, पोलीस निरीक्षक वाशी तसेच लोकसेवा हायस्कूल गिरवलीचे सहशिक्षक दस्तगीर पठाण व रणजित सोन्ने यांचे मार्गदर्शन लाभले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रेरणादायी संदेश देत मोठी स्वप्ने पाहून कठोर परिश्रमाच्या जोरावर यश संपादन करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्रेश्वर सोन्ने यांनी केले, तर प्रास्ताविक उपसरपंच सतीश सोन्ने यांनी मांडले. उपस्थित मान्यवर, ग्रामस्थ, महिला भगिनी, युवक, ज्येष्ठ नागरिक, पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांचे आभार राजकुमार सोन्ने यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बाळू बप्पा सोन्ने, शिवाजी सोन्ने, पोपट सोन्ने, राहुल सोन्ने, विकास सोन्ने, अशोक सोन्ने, सुहास येडे, संदीप सोन्ने, बालाजी सोन्ने आणि सागर सोन्ने यांनी विशेष परिश्रम घेतले.

# वडगाव काटी येथे मारहाण; पाच जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मे -**

वडगाव काटी शिवारात मारहाण व सोन्याची चैन हिसकावल्याप्रकरणी तामलवाडी पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी पंकज धावणे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपींनी शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी व काठीने मारहाण केली तसेच गळ्यातील अडीच तोळ्याची सोन्याची चैन काढून घेत जिवे मारण्याची धमकी दिली.

याप्रकरणी जितेंद्र काळे, मनोज काळे, सुखदेव काळे, श्रीकांत काळे व सचिन काळे (सर्व रा. वडगाव काटी) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### 30 जून २०२६ पर्यंतच अंतिम मुदत!


# एचएसआरपी नंबर प्लेट नसलेल्या वाहनांवर १ जुलैपासून कारवाई : हर्षल डाके

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मे -**

केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ मधील नियम ५० तसेच रस्ते व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसूचनेनुसार वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (HSRP) बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. यानुसार १ एप्रिल २०१९ पासून नोंदणी होणाऱ्या सर्व नवीन वाहनांना एचएसआरपी बसविण्याची अट लागू करण्यात आली होती.

तसेच सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. १३०२९/१९८५ (एम. सी. मेहता विरुद्ध केंद्र शासन) प्रकरणात १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व जुन्या वाहनांनाही एचएसआरपी बसविण्याचे निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व जुन्या वाहनांना एचएसआरपी बसविण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्यातील जुन्या वाहनांपैकी केवळ सुमारे ५० टक्के वाहनांवरच एचएसआरपी बसविण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने शासनाने वाहनधारकांना आणखी एक अंतिम संधी दिली आहे. त्यानुसार १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना कडठझ




बसविण्यासाठी ३० जून २०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके यांनी दिलेल्या माहितीनुसार, १ जुलै २०२६ पासून एचएसआरपी न बसविणाऱ्या जुन्या व नवीन सर्व वाहनांवर वायुवेग पथकाद्वारे कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

याशिवाय १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांबाबत एचएसआरपीबसविल्याशिवाय अनेक वाहनविषयक कामकाजही बंद करण्यात येणार आहे. यामध्ये खाजगी वाहनांचे नोंदणी प्रमाणपत्र नूतनीकरण, वाहन हस्तांतरण, आरसीवरील पत्ता बदल, वित्त बोजा चढविणे किंवा उतरविणे, दुय्यम नोंदणी प्रमाणपत्र, ना-हरकत प्रमाणपत्र, वाहनांमध्ये बदल आदी कामांचा समावेश आहे.

मात्र परिवहन संवर्गातील जुन्या वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण या प्रक्रियेला यामधून वगळण्यात आले आहे. वाहनधारकांनी शासनाच्या सूचनांचे पालन करून विहित मुदतीत एचएसआरपी बसवून घ्यावी, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके यांनी केले आहे.

# जयप्रकाश विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

### इयत्ता ५ वी व ८ वीतील २० विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मे -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर ता. जि. धाराशिव येथील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील एकूण २० विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले असून परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या परीक्षेत इयत्ता ५ वीचे १३ विद्यार्थी तर इयत्ता ८ वीचे ७ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र झाले आहेत. इयत्ता ५ वीमध्ये आयुष अमोल किरदत्त याने २२४ गुण मिळवत विशेष यश संपादन केले.

तसेच पार्थ लालासाहेब गायकवाड १९८, गुंजन ज्ञानेश्वर जमदाडे १७६, अरबाज आमिर शेख १७४, योगीराज भरतरी लोमटे, रणजीत हिने २३२ गुण मिळवत अव्वल यश मिळविले. तसेच जगताप भैरवी शरद १७६, ढोले श्रावणी बाबासाहेब १६४, डोंगरे गौरी काकासाहेब १५६, सारंग युगंधरा विनय १५२, घोडके प्रेम श्रीकांत १५० आणि जावळे विश्वजीत शहाजी १४० गुण मिळवत शिष्यवृत्तीस पात्र ठरले.

यशस्वी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती विभाग प्रमुख अभिजीत घोळवे तसेच विनय सारंग, भिमराव कांबळे, मोहन चव्हाण आणि योहान वसावे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाष दादा कोळगे, रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सचिन कांबळे यांनी केले.

# राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीसपदी रामेश्वर पवार व प्रवीण घोलप यांची नियुक्ती



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मे -**

राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या संघटनात्मक बांधणीला बळकटी देण्याच्या दृष्टीने येडशी येथील इंजिनिअर रामेश्वर पवार तसेच तेरखेडा येथील प्रवीण घोलप यांची प्रदेश सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

नियुक्तीपत्र राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख यांच्या हस्ते तसेच जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आले.

रामेश्वर पवार आणि प्रवीण घोलप हे युवकांमध्ये सक्रिय कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात.

सामाजिक व संघटनात्मक कार्यातील योगदानाची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविली आहे.

नियुक्तीनंतर दोघांनीही शरद पवार यांच्या विचारांचा प्रसार करून पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी कार्य करण्याचा विश्वास व्यक्त केला.

यावेळी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जाहिर प्रगटन
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार उमरगा करीता यांचे कार्यालय**

**प्रकरण क्र. /२०२५**

**प्रकरणः- मृत्यू प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदार **संतोष शंकर गिरीबा रा. मुरुम ता. उमरगा** येथील रहीवासी असून अर्जदार यांनी **(त्यांचे आजोबा नामे महालिंगप्पा महादेव गिरीबा यांचा)** यांचा मृत्यू **दिनांक** १०.०४.१९७० रोजी मुरुम येथे झाला आहे. याबाबत त्यांचे मृत्यू नोंदणीचे प्रमाणपत्र द्यावे यासाठी या कार्यालयात अर्जदार यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर मृत्यू नोंदीबाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत उक्त न्यायालयातलेखी स्वरुपात आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप आला नाही तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक** ०७.०५.२०२६ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार,**
**उमरगा करिता**

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सौरऊर्जा कंपनीच्या प्लॉटमधून साडेतीन लाखांचा साहित्य लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मे -**

बेंबळी ते धाराशिव मार्गावरील बरमगाव बु. शिवारातील सौरऊर्जा कंपनीच्या प्लॉटमधून अज्ञात चोरट्यांनी लाखो रुपयांचे साहित्य चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रज्ञा नारायण देशमुख (वय २४, रा. देवळाली ता. जि. धाराशिव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून त्यांच्या वडिलांच्या मालकीच्या बेंबळी ते धाराशिव जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या सत्कर्म ग्रीन एनर्जी प्रा. लि. या सौरऊर्जा कंपनीच्या प्लॉटमधून चोरी झाल्याचे समोर आले आहे.

दि.७ मे रोजी मध्यरात्री १२ ते पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी १ डीसी केबल्स ४ स्के. मिमीचे ४५०० मीटर, एमसी-४ कनेक्टर ११२ नग तसेच ३ कंड्युट पाईप ४००० मीटर असा एकूण ३ लाख ३२ हजार ९९२ रुपयांचा माल चोरून नेला. या प्रकरणी प्रज्ञा देशमुख यांनी दि.१९ मे रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### तेरणा अभियांत्रिकीत मेकॅनिकल विद्यार्थ्यांसाठी प्टिट्यूड टेस्ट

**धाराशिव, दि.२० मे -**

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये मेकॅनिकल इंजिनिअर्सची वाढती मागणी लक्षात घेता तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मेकॅनिकल विभागात विद्यार्थ्यांसाठी प्टिट्यूड टेस्ट व प्री-प्लेसमेंट ट्रेनिंगचे आयोजन करण्यात आले. मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना सध्या नोकरीच्या मोठ्या संधी उपलब्ध होत असून, केवळ पदवीपेक्षा ज्ञान व कौशल्याला अधिक महत्त्व दिले जात असल्याने विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक तयारी व्हावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. नामांकित कंपन्यांच्या प्लेसमेंट प्रक्रियेत विद्यार्थ्यांना टिकून राहता यावे यासाठी कौशल्याधारित प्रशिक्षण देण्यात आले. टेस्टमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. माने, अॅकॅडमिक डीन व मेकॅनिकल विभाग प्रमुख डॉ.डी.डी. दाते तसेच प्रा. रणजीत दंडनाईक आणि प्रा. वैभव जगदाळे यांच्या हस्ते करण्यात आले. भरतीपूर्व प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढल्याची भावना विद्यार्थ्यांनी यावेळी व्यक्त केली.

### मंगरुळ जि.प. प्रशालेच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**मंगरूळ, दि.२० मे -**

२२ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत तुळजापूर तालुक्यातील



मंगरुळ येथील जिल्हा परिषद प्रशालेच्या दोन विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. इयत्ता पाचवीतील जुबेर चांदसाहेब शेख तसेच इयत्ता आठवीतील साक्षी महेश डोंगरे हे विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक गणेश तनपुरे, श्री कोचिंग क्लासेसचे आशिष साठे तसेच शिक्षिका येरटे, भोसले, साखरे, वाघचौरे व सरडे यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेच्या या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी दक्षता समिती, शिक्षणप्रेमी नागरिक व ग्रामस्थांकडून विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### सुभाष माळवदकर यांचे निधन

**लोहारा, दि.२० मे -**



लोहारा शहरातील भावसार समाजाचे ज्येष्ठ नागरिक कै. सुभाष (बाबुराव) विठ्ठलराव माळवदकर (वय ८३) यांचे दि.२० एप्रिल २०२६ रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर कास्ती रोड येथील सार्वजनिक स्मशानभूमीत अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुली, सून, दोन नाती व दोन नातू असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने लोहारा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# नळदुर्ग किल्ल्यासह ऐतिहासिक वास्तूंच्या संवर्धनाला गती

**साडेसहा कोटींच्या निधीतून दुरुस्ती व पर्यटन विकासाची कामे सुरु... आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...**







**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२० मे -**

जिल्ह्याच्या ऐतिहासिक वैभवाची ओळख असलेल्या नळदुर्ग किल्ला तसेच धाराशिव शहरातील जुने मुन्सिफ कोर्ट आणि तत्कालीन जिल्हा कारागृहाच्या जतन व संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात येत असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

महाराष्ट्रातील सर्वात मोठा भुईकोट किल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नळदुर्ग किल्ल्याच्या संवर्धनाच्या कामाला युद्धपातळीवर सुरुवात करण्यात आली असून, किल्ल्याचे मूळ सौंदर्य आणि ऐतिहासिक महत्त्व अबाधित राखत त्याचा पर्यटन विकास करण्यावर प्रशासनाचा भर असल्याचे त्यांनी सांगितले. पहिल्या टप्प्यात सुमारे साडेसहा कोटी रुपयांच्या निधीतून विविध विकासकामांना प्रारंभ करण्यात आला आहे. यामध्ये मुख्य तटबंदी आणि बुरुजांच्या दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली असून, भिंतींवर वाढलेले गवत आणि झाडाझुडपे हटवून भगदाडे शास्त्रोक्त पद्धतीने दुरुस्त केली जात आहेत.

तसेच जगप्रसिद्ध नर-मादी धबधब्यासह संपूर्ण परिसराचा टप्प्याटप्प्याने कायापालट करण्यात येणार असल्याची माहितीही आमदार पाटील यांनी दिली.

नळदुर्ग किल्ला हा आपल्या इतिहासाचा आणि भौगोलिक अस्मितेचा जिवंत साक्षीदार आहे. या वास्तूचे वैभव पुढील पिढ्यांपर्यंत सुरक्षित पोहोचवण्यासाठी आणि पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी हे संवर्धन कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे, असे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी नमूद केले. दरम्यान, धाराशिव शहरातील जुने मुन्सिफ कोर्ट आणि तत्कालीन जिल्हा कारागृह या वास्तूदेखील इतिहासाच्या अनेक आठवणी जपून आहेत. न्यायदानाने गजबजलेले जुने मुन्सिफ कोर्ट, समोरील ऐतिहासिक तोफ आणि तत्कालीन कारागृह आजही प्रशासकीय व्यवस्थेच्या इतिहासाची साक्ष देत उभे आहेत.

आधुनिकतेच्या बदलत्या काळातही या वास्तूंनी आपली ऐतिहासिक ओळख कायम राखली असून, हा वारसा जतन करून पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे हे आपले सामूहिक कर्तव्य असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## कंडारी शिवारात केळीचे पीक जळून खाक; ११ लाखांहून अधिक नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मे -**

परंडा तालुक्यातील कंडारी शिवारात सामाईक बांधावरील वाळलेले गवत जाळताना आग पसरून उभ्या केळी पिकाचे मोठे नुकसान झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी आंबी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी राजेंद्र रामहारी मोरे (वय ५७, रा. कंडारी ता. परंडा जि. धाराशिव) यांनी दि. १८ मे २०२६ रोजी दुपारी १२.०५ वाजण्याच्या सुमारास कंडारी शिवारातील शेत गट क्रमांक २९५ मधील सामाईक बांधावरील वाळलेले गवत जाळले.

दरम्यान, आग पसरल्याने फिर्यादी महारुद्र रामहारी मोरे (वय ६१, रा. कंडारी ता. परंडा जि. धाराशिव) यांच्या शेतातील उभे असलेले केळीचे पीक तसेच ठिबक सिंचन साहित्य जळून खाक झाले. या घटनेत अंदाजे ११ लाख २६ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी महारुद्र मोरे यांनी दि.१९ मे रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून आंबी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## लोहारा येथे प्रतिबंधित गुटखा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मे -**

लोहारा पोलीस ठाण्याच्या पथकाने भातागळी येथे कारवाई करत महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ जप्त केला.

या प्रकरणी सचिन शंकर वाले (वय ४६, रा. भातागळी ता. लोहारा जि. धाराशिव) यांच्याकडून केसरयुक्त विमल पान मसाला तंबाखू पुड्यांसह एकूण १० हजार ८०० रुपयांचा माल विक्रीसाठी बाळगलेला आढळून आला.

याप्रकरणी पोलिसांनी गुटखा साहित्य जप्त करून संबंधिताविरुद्ध लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## मालवाहू वाहनाची दुचाकीला धडक; एकजण ठार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मे -**




उमरगा तालुक्यातील हंगरगा शिवारात भरधाव व निष्काळजीपणे चालविण्यात आलेल्या मालवाहू वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने एका व्यक्तीचा मृत्यू तर दुसरा गंभीर जखमी झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. याप्रकरणी मुरुम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिगंबर मारुती खंदारे (रा. किसान चौक, मुरुम ता. उमरगा जि. धाराशिव) व वसंत उद्धव राठोड (वय ४५, रा. आचार्य तांडा, मुरुम ता. उमरगा जि. धाराशिव) हे दि. १८ मे २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजण्याच्या सुमारास एमएच २५ एबी ६९०१ क्रमांकाच्या मोटरसायकलवरून प्रवास करत होते.

दरम्यान, हंगरगा शिवारातील तुळजाभवानी सुतमिल शेजारील मुकबधीर शाळेसमोर, नळदुर्ग ते तुळजापूर रस्त्यावर एमएच २५ एजे ४११२ क्रमांकाच्या टाटा मालवाहू वाहनाच्या चालकाने वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवत अचानक उजव्या बाजूस इंडिकेटर न देता वळविले. त्यामुळे संबंधित वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिली.

या भीषण अपघातात वसंत राठोड हे गंभीर जखमी होऊन जागीच मयत झाले, तर दिगंबर खंदारे हे गंभीर जखमी झाले आहेत.

याप्रकरणी विजया वसंत राठोड (वय २८, रा. आचार्य तांडा, मुरुम ता. उमरगा जि. धाराशिव) यांनी दि.१९ मे रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून मुरुम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## आळणी येथील अपूर्ण पाणीपुरवठा योजना व सांडपाणी व्यवस्थापनाची कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मे -**

आळणी (ता.जि. धाराशिव) येथील अपूर्ण पाणीपुरवठा योजना तात्काळ पूर्ण करण्यात यावी तसेच गावातील सांडपाणी व्यवस्थापन, नालेसफाई आणि नालेदुरुस्तीची कामे पावसाळ्यापूर्वी तातडीने करण्यात यावीत, अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भातील निवेदन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदळकर यांना ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्यांसह सादर करण्यात आले. यावेळी अभयसिंह वीर, अशोक गाडे, विश्वजीत पाटील, युवराज कोळी, अजय गाडे, रियाज



सय्यद आणि शुभम महामुनी यांनी ग्रामस्थांच्या वतीने निवेदन देऊन गावातील विविध समस्या मांडल्या.

ग्रामस्थांनी निवेदनात म्हटले आहे की, अपूर्ण पाणीपुरवठा योजनेमुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच गावातील सांडपाणी व्यवस्थापन आणि नालेसफाईची कामे रखडल्याने आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ही कामे तातडीने पूर्ण करावीत, अशी मागणी करण्यात आली.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदळकर यांनी पाणीपुरवठा योजनेचा विषय जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मांडण्यात येईल तसेच नालेसफाई व संबंधित कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना आरोग्य विभागामार्फत देण्यात येतील, असे आश्वासन दिले.

## डोकेवाडीच्या सख्या चुलत बहिणींचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२० मे -**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोकेवाडी येथील विद्यार्थिनी श्रावणी रेवन साळुंखे व शिवानी सुमंत साळुंखे या सख्या चुलत बहिणींनी इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करत पात्रता मिळवली आहे.



सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे हे यश मिळाल्याची भावना विद्यार्थिनींनी व्यक्त केली. या यशामुळे शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यशस्वी विद्यार्थिनींचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हरिदास आहेर, शिशुपाल साळुंके, मुख्याध्यापक संजय क्षीरसागर, सोमनाथ तौर, रुपाली गवळी, सविता गिरी, संघ लोखंडे, रजनी आहेर यांनी अभिनंदन केले.

# स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज

**६३ संस्थांतील १०५१ सदस्य बजावणार मतदानाचा हक्क... विविध समित्यांचे गठन...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मे -**




स्थानिक स्वराज्य संस्था (उस्मानाबाद-लातूर-बीड) मतदारसंघाची निवडणूक प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक आणि प्रभावीपणे पार पाडण्यासाठी प्रशासनाने विविध समित्यांचे गठन केले असून संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. या निवडणुकीत ३० नगर परिषद, १ महानगरपालिका, २९ पंचायत समिती सभापती आणि ३ जिल्हा परिषदांचा समावेश असलेल्या एकूण ६३ स्थानिक स्वराज्य संस्थांतील प्रतिनिधी मतदान करणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात मंगळवारी झालेल्या आढावा बैठकीत ही माहिती देण्यात आली. बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदाळकर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी शिरीष यादव, निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे, उपजिल्हाधिकारी प्रवीणकुमार धरमकर यांच्यासह बीड व लातूर जिल्ह्यातील अधिकारी ऑनलाईन उपस्थित होते.

जिल्हाधिकारी पुजार यांनी सांगितले की, निवडणुकीची अधिसूचना दि.२५ मे २०२६ रोजी प्रसिद्ध होणार असून नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची अंतिम मुदत दि.१ जून आहे. अर्ज छाननी दि.२ जून रोजी होणार असून उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख दि.४ जून निश्चित करण्यात आली आहे. मतदान दि. ८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत होणार असून मतमोजणी दि. २५ जून रोजी पार पडणार आहे.

या निवडणुकीसाठी एकूण ११३२ सदस्यांचा मतदार म्हणून समावेश करण्यात आला असला तरी त्यापैकी १०५१ सदस्य मतदानासाठी पात्र ठरले आहेत. बीड जिल्हा परिषदेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे तेथील सदस्य मतदानातून वगळण्यात आले आहेत. धाराशिव व लातूर जिल्हा परिषदांचे निवडून आलेले सदस्य, स्वीकृत सदस्य, नगरसेवक, स्वीकृत नगरसेवक आणि पंचायत समिती सभापती यांनाच मतदानाचा अधिकार राहणार असल्याचेही पुजार यांनी स्पष्ट केले.

आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश देताना सार्वजनिक ठिकाणी लावलेले राजकीय स्वरूपाचे होर्डिंग तात्काळ हटविण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत. तसेच आचारसंहितेच्या कालावधीत कोणत्याही राजकीय सभा घेता येणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले.

निवडणूक प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्यासाठी आदर्श आचारसंहिता, मतदार यादी, नामनिर्देशन स्वीकृती, मतदान कर्मचारी व्यवस्थापन, प्रशिक्षण, साहित्य वितरण, स्ट्राँग रूम, मतपत्रिका छपाई, कायदा व सुव्यवस्था, मतमोजणी, माध्यम समन्वय, अवैध दारू प्रतिबंधक कक्ष तसेच एक खिडकी परवाना समिती अशा विविध समित्यांचे गठन करण्यात आले असून संबंधित विभागातील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## लोहारा खुर्द येथे मतदार नोंदणी व नाव दुरुस्ती शिबिरास प्रतिसाद

**ग्रामस्थांची शासकीय कार्यालयाच्या फेऱ्यांतून सुटका...**

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२० मे -**




कै. गयाबाई रावसाहेब पाटील बहुउद्देशीय सेवाभावी सामाजिक संस्थेच्या वतीने लोहारा तालुक्यातील लोहारा खुर्द येथे मतदार नाव दुरुस्ती व नवीन मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. गाव कारभारी वस्ती, जुने गाव तसेच तांड्यावरील नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या उपक्रमामुळे अनेक नागरिकांची शासकीय कार्यालयाची पायपीट टळून मोठा दिलासा मिळाला. लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत असणे आवश्यक असताना, नावातील चुका किंवा नाव नोंदणी न झाल्यामुळे अनेकांना अडचणींचा सामना करावा लागतो. ही बाब लक्षात घेऊन संस्थेने सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम राबविला.

तसेच शासनाच्या आदेशानुसार सुरू झालेल्या जनगणना सर्व्हेच्या कामात नागरिकांनी संबंधित कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

शिबिरादरम्यान मंडळाधिकारी व्ही.एम. मणियार, महसूल सहाय्यक वजीर अत्तार तसेच कृषी सहाय्यक एन.डी. पाटील यांच्या उपस्थितीत नागरिकांच्या अर्जांची तपासणी व नोंदणी प्रक्रिया पार पडली.

संस्थेचे अध्यक्ष तथा माजी सरपंच शेखर रावसाहेब पाटील यांच्या पुढाकारातून हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. मतदारांना योग्य मार्गदर्शन करून त्यांची गैरसोय दूर करण्याचा प्रयत्न केल्याने नागरिकांतून समाधान व्यक्त करण्यात आले.